सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २७ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधून केलेल्या विधानाची पाकिस्तानने घेतली दखल

### म्हणाला...आम्हाला शांतता हवी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७गांधीनगर गुजरात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑपरेशन सिंदूरनंतर प्रथमच गुजरात दौऱ्यावर आहेत. ते मंगळवारी गांधीनगर येथे पोहोचले. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानला अल्टिमेटमही दिला. पंतप्रधान मोदींच्या विधानानंतर पाकिस्तानला चांगलीच मिरची झोंबली आहे. तो शांततेच्या गप्पा मारू लागला आहे. पंतप्रधान मोदींचे विधान प्रादेशिक शांततेला धोका निर्माण करणारे आहे, असे पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी वडोदरा,



भुज आणि दाहोदलाही भेट दिली.

पंतप्रधान मोदींच्या विधानासंदर्भात प्रतिक्रिया देताना पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, भारताच्या पंतप्रधानांनी गुजरातमधून केलेल्या विधानाची पाकिस्तानने दखल घेतली आहे. त्यांच्या विधानामुळे प्रादेशिक शांततेला धोका निर्माण गोऊ शकतो. आम्हाला शांतता हवी आहे. पण आम्हाला धोका वाटला तर आम्ही प्रत्युत्तर देऊ.

पाकिस्तानने आपल्या निवेदनात स्वतःला शांततेचा समर्थक म्हणवले आहे. एवढेच नाही तर, आपण यूएन मिशनमध्ये सर्वात पुढे होतो. तसेच, आपण दहशतवादाविरोधात जागतिक पातळीवर महत्वाची भूमिका बजावली आहे, असे पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्रालयाने म्हटले आहे.

गुजरातमधील गांधीनगर येथे बोलताना पंतप्रधान मोदी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत म्हणाले, ६ मे च्या रात्री पाकिस्तानात जे मारले गेले, त्यांना स्टेट ऑनर देण्यात आला. त्यांच्या शवपेट्यांवर पाकिस्तानी झेंडे लावण्यात आले आणि तेथील सैन्याने त्यांना सलामीही दिली. यावरून स्पष्ट होते की, दहशतवादी कारवाया हे प्रॉक्सी वॉर नाही, तर तुमची (पाकिस्तानची) विचारपूर्वक आखलेली युद्धनीती आहे. जर तुम्ही युद्ध करत असाल, तर तुम्हालाही त्याच पद्धतीने उत्तर मिळेल. तत्पूर्वी, पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून अनेक दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहेत.

## शेतजमीनच्या कामात २३ लाख घेतले, ५ लाख घेताना रंगेहात अटक

### उपजिल्हाधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२७छ. संभाजीनगर**

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यात सरकारी अधिकाऱ्यांकडून लाच घेण्याचं प्रमाण वाढल्याचं दिसून येत आहे. कारण, एसीबीच्या धाडीत ग्रामसेवकापासून ते तहसीलदारांपर्यंत कारवाई केल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. विशेष म्हणजे परभणी जिल्ह्यात महिला क्रीडा अधिकाऱ्यासही लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली होती. या घटनेनं जिल्ह्यात खळबळ उडाली होती, आता छत्रपती संभाजीनगरमध्ये चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांस अटक करण्यात आली आहे. तब्बल



५ लाख रुपयांची लाच घेताना एसीबीने आरडीसी महोदयांना रंगेहात अटक केली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील आरडीसी म्हणजेच निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकुनामार्फत ही लाच घेण्यात येत असताना अटक करण्यात आली असून विनोद खिरोळकर असं आरडीसींचं नाव आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठीपूर्वी या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी मोठ्या लाचेची मागणी केली होती. त्यानुसार, संबधित तक्रारदाराकडून २३ लाख रुपये घेतले होते. मात्र, तरीही १८ लाख पुन्हा मागण्यात आले होते. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत ही लाच घेतली जात होती.

## पंतप्रधान मोदींना भारतीय असल्याचा अभिमान, चिमूटभर सिंदूरची किंमत जगाला दाखवून दिली : अमित शाह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मुंबई दौऱ्यावर होते. मुंबईत अनेक कार्यक्रमांना अमित शाह उपस्थित राहणार होते. परंतु, मुंबईतील पावसाची बॅटिंग आणि दिल्लीतील एका महत्त्वाच्या कार्यक्रमामुळे अमित शाह यांनी मुंबई दौरा आटोपता घेतला. परंतु, माधवबाग येथील लक्ष्मी-नारायण मंदिराच्या १५० व्या उत्सवाच्या कार्यक्रमाला अमित शाह आवर्जून उपस्थित होते. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना अमित शाह यांनी विविध विषयांवर स्पष्ट शब्दांत भाष्य केले.

अमित शाह म्हणाले की, अनेकांना माहिती नसेल माझा जन्म मुंबईचा आहे. मी या मंदिरात अनेकदा आरतीसाठी यायचो. त्यावेळी या ठिकाणी एक हॉल होता. कमी पैशात लग्न लावले जात होते. संस्था मदत करत होती. या ठिकाणी अनेक प्रकारचे सामाजिक कार्यक्रम होत होते. इंग्रजांचे सरकार असताना मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी धार्मिक संस्था उभ्या करणे सोपे नव्हते. १५० वर्ष एक संस्था चालवणे सोपे नाही. मी जुन्या संस्था चालवल्या आहेत.



माधवबागच्या ट्रस्टींचे अभिनंदन करतो, असे प्रतिपादन अमित शाह यांनी केले.

काही जण म्हणतात की, पंतप्रधान मोदी यांनी काय केले? पंतप्रधान मोदी यांनी देशाची अर्थव्यवस्था चौथ्या क्रमांकावर आणली आहे. आगामी काही काळात देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर जाईल. २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भारतीय असल्याचा अभिमान आहे. आपली सुरक्षा भेदण्याचा प्रयत्न केला त्यांना आपण सडेतोड उत्तर दिले. आपली सुरक्षा आता भक्कम झाली आहे, असे अमित शाह यांनी नमूद केले. दरम्यान, मला फ्रेंच डिप्लोमेट भेटले होते. मी त्यांना विचारले की, १० वर्षांत भारतात काय बदलले, असे तुम्हाला वाटते. ते मला म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी भारतीय पासपोर्टची किंमत वाढवली. कोणत्याही देशात जा, आपले हसतमुखाने स्वागत केले जाते. राम मंदिराचे संकल्प प्रत्यक्षात आला. काशी विश्वेश्वर कॉरिडोर बनवले. भारतीय योग आणि आयुर्वेद जगभरात नेले. हे सगळे परिवर्तन मोदींनी केले. देशाचा इतिहास सुवर्ण अक्षरात लिहिला जाईल. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून एक चिमूटभर सिंदूरचे, कुंकवाचे महत्त्व सगळ्या जगाला दाखवले, सगळ्यात जास्त सिंदूर हा शब्द गुगलवर सर्च केला. १० कोटी लोकांनी हा शब्द सर्च केला. तरीही अजून सिंदूरचे महत्त्व त्या लोकांना समजलेले नाही, अशी टीका अमित शाह यांनी केली.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांना माफीवीर बोलणारे लोक मूर्ख, देवेंद्र फडणवीसांचं राहुल गांधींवर टीकास्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

स्वातंत्र्यवीर सावरकर हे अंदमानात शिक्षा भोगत होते तेव्हा जेलची परिस्थिती अतिश्य वाईट होती. अंदमानात अनेकांवर परिणाम झाला पण सावकरांमध्ये कुठलीही निराशा दिसली नाही. इतरांना पिटीशन करण्यात किंवा लवकर सुट्टी मिळावी, यासाठी ते मदत करायचे. पण काही मूर्ख लोक त्यांना माफीवीर म्हणतात. न्यायालयाने अशा लोकांना फटकारले हे बरे झाले, असे वक्तव्य करत देवेंद्र फडणवीस यांनी अप्रत्यक्षपणे राहुल गांधी यांच्यावर टीकास्त्र सोडले. सर्वोच्च न्यायालयाने सावरकरांना माफीवीर म्हणणाऱ्यांना दम दिला आणि 'पुन्हा असे बोलाल तर शिक्षा देऊ', अशी ताकीद दिली. त्यासाठी मला सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानायचे आहेत. काही गोष्टी चुकीच्या पद्धतीनं घेतल्या जात असतील



तर ते चुकीचं आहे. आता त्यांना अक्कल येईल असं वाटतं. मात्र, माझं हे बोलणं बाळबोध, आहे हे पण मला माहिती आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांची देशभक्ती आणि हिंदुत्व प्रज्वलित झालं तर आपलं काही खरं नाही हे यांना माहिती आहे, असे फडणवीस यांनी म्हटले. ते मंगळवारी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

तेव्हाचे अंदमान जेल अतिशय वाईट होते. अंदमानातील व्यक्ती परत येऊ नये, अशी व्यवस्था केली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना एकांतवासाची शिक्षा त्यांना दिली गेली. काय अवस्था त्यावेळी माणसाची होत असेल. ते जेलमध्ये कोळशाचा वापर करुन कविता लिहायचे आणि पाठ करायचे. जनरल बारी सारखा जेलर कैद्यांना वाईट वागवायचा. तेव्हा सावरकरांनी बारीसोबत संघर्ष केला आणि कैद्यांना मौलिक अधिकार मिळवून दिले, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.सावरकर यांचे हिंदुत्व देखील विज्ञाननिष्ठ होते. ते व्यक्ती नव्हे, ते एक संस्था होते. त्यांच्या नावाने संशोधन केंद्र सुरु होत आहे. आम्ही निधी यासाठी अपुरा पडू देणार नाही. सावरकरांची डिग्री मुंबई विद्यापीठाने परत केली. मात्र, त्यांची बॅरिस्टरची डिग्री मात्र परत केली नाही. आशिष शेलार आता आपण यासाठी प्रयत्न केला पाहिजे. इंग्लंडमध्ये यासाठी पत्रव्यवहार सुरु करु, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## बीडमध्ये कंटेनरने ९ जणांना चिरडलं, ६ जणांचा जागीच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७बीड**

बीडमध्ये सोमवारी रात्री उशिरा झालेल्या भीषण अपघातामध्ये ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गढी फाट्याजवळ हा अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की यामध्ये सहा जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला. या अपघाताचा थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.




बीडच्या गेवराई तालुक्यातील गढी परिसरात रात्री उशिरा हा अपघात झाला. सुरुवातीला पाण्यामुळे कारला अपघात झाला. ही कार डिव्हायडरवर चढली. अपघात झाल्यामुळे कारमधील सर्व जण खाली उतरले आणि रस्त्याच्या कडेला उभे राहिले. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या भरधाव कंटेनरने सात जणांना चिरडले. या अपघातामध्ये सहा जणांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर तर दोन किरकोळ जखमी झाले.

या अपघातामध्ये मृत्यू झालेले सर्वजण गेवराई तालुक्यातील होते. अपघातानंतर रस्त्यावर अक्षरशः रक्ताचे पाट वाहत होते. या अपघातामध्ये बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे यांचा मृत्यू झाला. अपघातामध्ये मृत्यू झालेले सर्वजण एकाच ठिकाणचे होते. त्यांच्या निधनाने गेवराईवर शोककळा पसरली आहे. या अपघाताचा तपास बीड पोलिसांकडून सुरू आहे.

या अपघाताची माहिती मिळताच बीड पोलिसांनी आणि आपत्कालीन पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली होती. सर्वांचे मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले होते. या अपघातानंतर कंटेनर चालक फरार झाला होता. पोलिसांनी या कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करत त्याचा शोध सुरू केला आहे. या अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू झाल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

## आदित्य ठाकरे, तू मोदी, शाह, फडणवीस यांची नावं घेतलीस तर याद राख, नारायण राणे यांचा दम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मुंबई**

राजधानी मुंबईत सोमवारी झालेल्या मुसळधार पावसाने मुंबईकरांची दाणादाण उडवली होती. मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीवरही त्याचा परिणाम झाल्याचं पाहायला मिळालं. शहरातील भुयारी मेट्रो स्टेशनमध्ये पाणीच पाणी झाल्याने काही दिवसांपूर्वीच उद्घाटन झालेल्या मेट्रोचे स्थानकाचे धिंदवडे निघाले होते. त्यानंतर, शिवसेना नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी



मेट्रो स्टेशनची पाहणी केल्यानंतर भाजप आणि महायुती सरकारवर थेट निशाणा साधला. तर, आज पत्रकार परिषदेतून पुन्हा एकदा भाजपला लक्ष्य केलं आहे. नगरसेवकांना फोडण्यासाठी वापरला जाणारा पैसा हा मुंबईकरांचे आज जे हाल झाले त्यातून काढलेला असल्याचे आदित्य यांनी म्हटले होते. तसेच, केंद्रातील भाजप नेत्यांवरही आदित्य यांनी हल्लाबोल केला. त्यावरुन, आता माजी मंत्री आणि खासदार नारायण राणे यांनी आदित्य ठाकरेंना थेट इशारा दिला आहे. आदित्य ठाकरे, तू मोदी, शाह, फडणवीस यांची नावं घेतलीस तर याद राख, अशा शब्दात नारायण राणेंनी ठाकरेंचना दम भरला.

नारायण राणेंनी आज पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. तर, खासदार संजय राऊत यांनाही एकप्रकारे इशाराच दिला आहे. मुंबईतील पावसाची आठवण सांगताना नारायणे राणेंनी २६ जुलै २००५ ची घटना सांगितली. काल मुंबईत अतिवृष्टी झाली, विरोधकांमध्ये हाहाकार उडाला आहे. पत्रकारांना बिझी केले आहे, २६ मे रोजी २५२ मिमी पाऊस मुंबईत पडला. पण, आदित्य, उद्धव ठाकरे यांना एक आठवण करून देतो. २६ जुलै २००५ ला ९४४ मिमी पाऊस मुंबईत पडला होता. त्यावेळी, २७ तारखेला उद्धव ठाकरेंचा वाढदिवस होता, त्यांची राजवट असताना पडला, तरी मुंबई बुडाली नव्हती, असे नारायण राणेंनी म्हटलं.

## विजेच्या कडाक्यासह अमरावतीत मुसळधार पाऊस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावतीत दुपारी ४ वाजता पासून पावसाने जोरदार हजेरी लावली. वादळी वारा व विजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळत आहे. हवामान विभागाने पावसाचा अंदाज वर्तवला होता, तो तंतोतंत खरा ठरला आहे. गेल्या तीन - चार दिवसांपासून अमरावती जिल्ह्यात कधी ऊन तर कधी ढगाळ वातावरण पाहायला मिळत होते.

आज सकाळी ढगाळ वातावरण होते. त्यानंतर तीव्र ऊन होत. दुपारी चार पासून आभाळात ढग दाटून आले आणि पावसाला जोरदार सुरुवात झाली. शहरातील अनेक ठिकाणच्या



वीज पुरवठा ही खंडित झाला. सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाचा जोर वाढला आहे.

नैऋत्य मोसमी अर्थात मान्सून वेगाने प्रगती करत आहे. राज्यात रविवारी दाखल झालेल्या मान्सूनने केवळ २४ तासांत मुंबईपर्यंत धडक मारली आहे. पुढील तीन ते पाच दिवसांत मान्सून संपूर्ण राज्य व्यापेल, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

## संपादकीय ......

# शेतकऱ्यांना दिलासा मिळणार

हवामान खात्याने २०२५ साठी अत्यंत उत्साहजनक अणि दिलासादायक भाकित केले असून यानुसार गेल्या ६ वर्षांच्या तुलनेत यावर्षी पाऊस वेळेच्या आधीच येऊ शकतो, असे सांगितले आहे. अर्थात, दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील काही भागांत पावसाने हजेरी लावली आहे. मे महिन्याच्या मध्यान्हीच पावसाच्या सरी कोसळणे हा हवामान बदलांचा चमत्कार म्हणायला हवा. अन्यथा गेल्या २५-३० वर्षांत मे महिन्यामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर पाऊस कधीही झाल्याचे दिसून आलेले नाही.

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीमध्ये यंदा सरासरीच्या १०५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. आपल्या देशातील शेती ही प्रामुख्याने पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असल्याने हवामान खात्याने दिलेली चांगली बातमी ही कृषीप्रधान देशातील शेतकर्यांना नवा आशेचा किरण दाखविणारी आहे. हवामान खात्याचा अंदाज खरा ठरत असेल, तर देशाची अर्थव्यवस्था, शेती, शेतकर्यांसाठी अतिशय चांगली बाब राहू शकते. तज्ज्ञांच्या मते, वेळेवर पाऊस येणार असल्याने शेतकर्यांना पेरणीसाठी योग्य वेळ मिळेल आणि त्यामुळे पीक उत्पादनात सुधारणा होऊ शकते.साहजिकच ग्रामीण भागात मागणी वाढेल आणि अर्थव्यवस्था रुळावर येण्यास मदत मिळेल. शिवाय परिसरातील तलाव, विहीर, जलस्रोतांनाही वेळेवर येणारा पाऊस लाभदायी ठरणार आहे. भारतात दरवर्षी कोट्यवधी शेतकरी पावसाच्या पहिल्या शिडकाव्याची आतुरतेने वाट पाहत असतात. चांगल्या पावसाचा परिणाम खरीप पिकाच्या उत्पादनावर पडेल आणि त्यामुळे काही विशेष खाद्यपदार्थांच्या किमतीत घट होऊ शकते. तांदूळ, बाजरी, कापूस, मका, सोयाबीन, भुईमूग आदी खरीप पिकांचे उत्पादन हे चांगल्या पावसावर अवलंबून आहे. त्याची लागवड जून-जुलैपासून सुरू होते. अशोवळी पुरक पाऊस असेल, तर खरीप पिकांचे उत्पादन वाढण्यास हातभार लागेल आणि त्यामुळे महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते.

महागाई कमी झाली, तर अर्थव्यवस्थेला फायदा मिळेल. एकुणातच पाऊस हा भारतीय कृषीची जीवनरेषा आहे. एका अंदाजानुसार, पावसावर दोन खर्व डॉलरची अर्थव्यवस्था अवलंबून असून किमान ५० टक्के कृषी क्षेत्राला पावसामुळे पाणी मिळते. सुमारे ८०० दक्षलक्ष नागरीक ग्रामीण भागात राहतात आणि ते शेती कामावर अवलंबून आहेत. ते भारताच्या जीडीपीत चौदा टक्के योगदान देतात. त्याचवेळी पाऊस हा देशभरातील वीज उत्पादनाबरोबरच पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक असणारे तलाव भरण्याचेदेखील काम करतो. शेतीपासून ते जेवणाच्या टेबलापर्यंत एक साखळी असते आणि अशा स्थितीत पावसाळ्याचे वेळापत्रक बिघडले, तर संपूर्ण साखळीवर त्याचा परिणाम होतो. परिणामी, आर्थिक घडामोडीदेखील बिघडू शकतात. पावसाने खरीप पिकांना लाभ मिळतोच, त्याचवेळी रबी हंगामात म्हणजे हिवाळ्यात लागवड होणार्या पिकांसाठीदेखील मातीत आर्द्रता राखण्यास मदत करते.


२०२५ मध्ये चांगला पाऊस असण्याची शक्यता असताना सरकारने शेतकर्यांच्या चेहर्यावरील आनंद द्विगुणीत करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पावले टाकली पाहिजेत. गेल्या दोन दशकांत भारतीय हवामान खात्याने पावसासंबंधी केलेले भाकित बर्यापैकी अचूक ठरले आहे. मार्च २०२५ मध्ये ॲडव्हान्स एरोसोल लिडर सिस्टीम तैनात केली असून यामुळे पावसाचा अंदाज पूर्वीपेक्षा अधिक अचूक ठरत आहे, तरीही काही जिल्ह्यांत स्थानिक पातळीवर अचूक अंदाज आणि पावसाळ्यात स्थितीवर लक्ष ठेवणे यासाठीच्या प्रणालीचा अभाव आहे.

# शासकीय योजनाच्या लाभासाठी ग्रिस्टॅक फार्मर आय डी अनिवार्य

## अंतिम मुदत ३१ मे पर्यंत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७अमरावती** ५केंद्र सरकारने देशातील प्रत्येक शेतजमीनधारक शेतऱ्यांसाठी ग्रिस्टॅक शेतकरी आयडी घेणे अनिवार्य केले आहे. या आयडीशिवाय कोणताही शेतकरी केंद्र व राज्य शासनाच्या कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ घेऊ शकणार नाही. यामध्ये पी. एम. किसान सन्मान निधी योजना, पीक कर्ज, वीज बिल सवलत, पीक विमा, महाडीबीटी पोर्टल वरील सर्व शासकीय योजना, नैसर्गिक आपत्ती अनुदान व पोकरा योजनेचा समावेश आहे.कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने यांनी विशेष जनजागृती मोहीम राबविली असून, शेतकऱ्यांना वेळेत शेतकरी आयडी मिळण्याचे आवाहन केले आहे. असून, जर शेतकऱ्याकडे वैध शेतकरी आयडी नसेल तर त्यांना कोणताही शासकीय लाभ मिळणार नाही. ग्रिस्टॅक हा केंद्र सरकारचा एक




डिजीटल प्लॅटफार्म आहे. ज्याच्या माध्यमातून शेतकऱ्याची एकात्मिक माहिती एका डिजीटल आयडीमध्ये संकलित केली जाते. यात शेतकऱ्यांची जमीन, पीक पध्दती, सिंचन पध्दती, शासनाकडून घेतलेले लाभ, पीक विमा यासारख्या अनेक बाबींचा समावेश असतो. यामुळे योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत थेट आणि पारदर्शक पध्दतीने पोहोचविता येते. पी.एम. किसान सन्मान निधी वार्षिक रूपये सहा हजार, पिक कर्ज योजना, फळबाग लागवड योजना, मोफत व सवलतीचा दरात वीज पुरवठा, प्रधानमंत्री फसल विमा योजना, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई, पोकरा योजना, महाडीबीटी पोर्टलवरील सर्व शासकीय योजनांसाठी फार्मर आयडी आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी mhfr.agristack.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. शेतकरी आपल्या गावातील सीएससी सेवा केद्रांत जाऊन नोंदणी करू शकतात. नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांना एक युनिक फार्मर आयडी मिळेल. जो भविष्यातील सर्व योजनांमध्ये वापरण्यात येईल. शेतकरी आयडीसाठी आवश्यक कागदपत्रे- शेकऱ्यांचे आधार कार्ड, सातबारा व आठ-अ (सध्याचा व वैध), मोबाईल क्रमांक ओटीपीसाठी आवश्यक आहे. तरी सर्व शेतकऱ्यांनी ३१ मे पूर्वी फार्मर आयडी काढावा, असे आवाहन तालुका कृषी विभागाने केले आहे.

# बालिकेवरील अत्याचार प्रकरणात आजन्म कारावासाची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७ अमरावती**

बालिकेवर अत्याचारप्रकरणी येथील जिल्हा सत्र न्यायालय (क्र. १) यांनी बाल लैगिंक अत्याचार प्रकरणात आरोपीला आजन्म कारावास व ५० हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास दोन वर्षाची शिक्षा सुनावली आहे. प्रवीण उर्फ पंडू शंकरराव अंभोरे (वय ३८, रा. खंडारीपुरा, नांदगाव पेठ) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

न्यायालयात दाखल दोषारोप पत्रानुसार, पीडित सहा वर्षीय बालिका १२ डिसेंबर २०२१ रोजी सायंकाळाच्या सुमारास परिसरातील बौध्द मंदिरामागे खेळत होती. तेव्हा प्रवीणने बालिकेला पकडून तिच्यावर जबरदस्ती केली. याघटनेत नांदगावपेठ पोलिसांनी बालिकेच्या आईच्या तक्रारीवरून १२ डिसेंबर २०२१ रोजी आरोपी प्रवीणविरुध्द बाल लैगिंक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला होता.



याप्रकरणात तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक कविता पाटील यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी वकील ॲड. क्षीरसागर यांनी साक्षीदारांच्या साक्ष नोंदविल्या. सरकारी व बचाव पक्षाचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने सोमवारी आरोपीला कलम ४ पोक्सो कायद्यामध्ये १० वर्षाची शिक्षा व २० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त कारावास, तसेच कलम ३७६ (ए,बी.) मध्ये आजन्म कारावास व ५० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास २ वर्षाची शिक्षा सुनावली आहे.-

# हवामान अलर्ट! पिकांची व फळबागांसाठी तातडीने करा 'या' उपाययोजना

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

गेल्या काही दिवसांपासून मराठवाडा परिसरात हवामानात सातत्याने चढ-उतार होत आहेत. उन्हाच्या झळांमधून सुटका होत असली तरी अवकाळी मात्र पाठ सोडत नसल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांनी काही भागांत वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिला आहे. या हवामान बदलामुळे शेतकरी वर्गास काळजी घेणे अत्यावश्यक ठरत आहे. मराठवाडा विभागात पुढील काही दिवसांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामानाच्या या बदलत्या परिस्थितीचा परिणाम पिके, फळबागा आणि जनावरांवर होऊ नये म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील तज्ज्ञांनी विशिष्ट कृषी सल्ला दिला आहे.

२२ ते २३ मे दरम्यान

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

संभाजीनगर, बीड, जालना आणि मराठवाड्याच्या इतर भागांत तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.हवामान बदलामुळे मराठवाड्यात कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस आणि किमान तापमानातही हळूहळू घट होण्याची शक्यता आहे. यामुळे वातावरणात थोडेसा गारठा जाणवू शकतो.

**महत्त्वाची सूचना**

वादळी वाऱ्याचा वेग ताशी ५० -६० कि.मी. पर्यंत जाऊ शकतो, त्यामुळे काढणीस असलेले पीक व भाजीपाला लवकरात लवकर सुरक्षित ठिकाणी ठेवावे. हलक्या वाऱ्यांमध्ये उडणाऱ्या साधनसामग्रीची योग्य रचना करावी, असा सल्ला देण्यात आला आहे.

**पिक व्यवस्थापन**

✻ काढणीस तयार असलेले उन्हाळी मूग, उडीद, भुईमूग व भाजीपाला तातडीने काढून सुरक्षित साठवणीची व्यवस्था करावी.

✻ खरीप पिकांसाठी (कापूस, तूर, मका आदी) मध्यम ते भारी, निचऱ्याची चांगली जमिन निवडावी.

✻ पावसामुळे पाणी साचू नये, यासाठी निचरा व्यवस्थापन करावे.




**फळबाग व्यवस्थापन**

✻ केळी, आंबा, द्राक्ष अशा बागांमध्ये ठिंबक सिंचन व सावलीची व्यवस्था करावी.

✻ रोगग्रस्त पाने काढून टाकावीत व फवारणी वेळेवर करावी.

✻ झाडांच्या खोडाजवळ आच्छादन (मल्चिंग) करावे.

**पशुधन संरक्षण**

✻ जनावरे उघड्यावर बांधू नयेत, त्यांना सुरक्षित निवाऱ्यात ठेवावे.

✻ पावसात भिजू नयेत याची काळजी घ्यावी.

✻ पिण्याच्या पाण्यात पावसाचे पाणी मिसळू देऊ नये.

✻ उष्णतेपासून संरक्षणासाठी गोठ्याचे आच्छादन करावे, जनावरांना थंड व स्वच्छ पाणी द्यावे.

✻ जनावरे चरायला बाहेर नेऊ नये.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०





# तुम्ही पण रोज कोल्ड्रिंग पिता का?



**दि.२७ विदर्भ प्रजासत्ताक**

ब्राझीलचे प्रसिद्ध युरोलॉजिस्ट डॉ. थेल्स अँड्रेड यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे, जो आतापर्यंत ८५ लाखांहून अधिक लोकांनी पाहिला आहे. यामध्ये त्यांनी रुग्णाच्या मूत्राशयातून पिवळ्या खड्यांचे अनेक मोठे तुकडे काढण्यात आलेल्या शस्त्रक्रियेची झलक दाखवली.

डॉक्टरांनी सांगितले की, हे सर्व त्या माणसाच्या जास्त म्हणजेच दिवसाला तीन लिटर कोल्ड्रिंक पिण्याच्या सवयीमुळे घडले. डॉ. अँड्रेड यांनी स्पष्ट केले की, शीतपेयांसारख्या साखर आणि कार्बोनेटेड पेयांमध्ये फॉस्फरिक ॲसिड आणि इतर रसायने असतात. ज्यामुळे शरीरात आम्लयुक्त वातावरण तयार होते. यामुळे मूत्रमार्गात कॅल्शियमचे प्रमाण वाढते आणि खडे तयार होऊ लागतात.

डॉक्टरांच्या मते, रुग्णाच्या शरीरात खडे तयार होण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे सुरू होती. जेव्हा प्रकृती बिघडली तेव्हा तीव्र वेदना, लघवीतून रक्त येणे आणि उलट्या होणे, अशी लक्षणे दिसू लागली. त्यानंतर तपासणीत असे दिसून आले की, रुग्णाच्या मूत्राशयात मोठ्या प्रमाणात खडे जमा झाले होते आणि त्वरित शस्त्रक्रिया करण्यात आली

# ९० टक्के अनुदानावर मिळतोय मिनी ट्रॅक्टर, असा करा अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील स्वयंसहायता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधनेयांचा पुरवठा योजना राबविण्यात येते.या योजनेच्या लाभासाठी इच्छुकांनी ३० जून २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

या याजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९




ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने (कल्टिव्हेटर किंवा रोटाव्हेटर व ट्रेलर) खरेदी करण्यासाठी रूपये ३ लाख ५० हजार मर्यादेत ९० टक्के (कमाल रूपये ३ लाख १५ हजार) शासकीय अनुदान अनुज्ञेय आहे.

योजनेच्या लाभासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य महाराष्ट्राचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटांचे अध्यक्ष, सचिव व ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील असावेत. योजनेच्या माहितीसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालय येथे करावा.

# मान्सून लवकरच सक्रीय : पुढील तीन-चार दिवसांत या जिल्ह्यांत अतिवृष्टीच्या इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७ अमरावती**

नैऋत्य मोसमी अर्थात मान्सून वेगाने प्रगती करत आहे. राज्यात रविवारी दाखल झालेल्या मान्सूनने केवळ २४ तासांत मुंबईपर्यंत धडक मारली आहे.पुढील तीन ते पाच दिवसांत मान्सून संपूर्ण राज्य व्यापेल, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली.

दरम्यान, कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट परिसर या भागात मंगळवारी तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. मध्य महाराष्ट्र मराठवाड्यात पुढील दोन ते तीन दिवसांत अतीवृष्टीचा अंदाज विभागाने वर्तविला आहे.केरळ तसेच तळकोकणात वेळेपूर्वी दाखल झालेल्या मान्सूनने केवळ २४ तासांतच पुण्यासह मुंबईपर्यंत धडक मारली आहे. मान्सूनने सोमवारी मुंबई, पुणे तसेच सोलापूरपर्यंतचा भाग व्यापला आहे.

मराठवाडा आणि लगतच्या परिसरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामध्ये सध्या कोणताही बदल संभवत नसल्याने पुढील दोन ते तीन दिवसांत कोकण, गोव्यासह मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात पावसाची शक्यता




आहे.विदर्भातील काही ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. दरम्यान, अरबी समुद्रावर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे कोकण, पुणे व सातारा जिल्ह्यातील घाट परिसरात मंगळवारी तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये पुढील तीन ते चार दिवस अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## 'यलो अलर्ट' जारी

अहिल्यानगर, सातारा, पुणे, कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये दोन ते तीन दिवसांत तुरळक ठिकाणी अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. सांगली, सोलापूर, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाची शक्यताही विभागाने वर्तविली आहे. तर विदर्भात पुढील पाच दिवसांत 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २७ मे २०२५ शहर/ग्रामिण


# आरोग्य सुविधांच्या उपलब्धततेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करा -विभागीय आयुक्त श्वेता सिंघल


## आरोग्य सोयी-सुविधांचा विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात विभागातून तसेच परराज्यातून दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक आहे. या रुग्णालयात एकाच ठिकाणी मोठ्या आजारावर वैद्यकीय उपचार सुविधा उपलब्ध आहे, याचा समाजातील गोर-गरीब रुग्णांना लाभ व्हावा, यासाठी यंत्रणांनी वैद्यकीय उपचार सेवा-सुविधांमध्ये आणखी चांगल्याप्रकारे वाढ करावी. आवश्यक बाबींची तातडीने पूर्तता होण्यासाठी वाढीव निधी मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा रुग्ण कल्याण नियामक समितीच्या अध्यक्ष श्वेता सिंघल यांनी आज येथे दिले.

येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाच्या सभागृहात विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली रुग्ण कल्याण नियामक समितीची सभा आज संपन्न झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. आमदार सौ. सुलभाताई खोडके, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे तसेच समितीचे सदस्य महावितरणचे कार्यकारी अभियंता संजय सराटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहन पाटील, उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर आदी यावेळी बैठकीला उपस्थित होते.

याप्रसंगी बैठकीत सर्वप्रथम १२ एप्रिल २०२३ रोजी संपन्न झालेल्या रुग्ण कल्याण नियामक समितीच्या सभेचे इतिवृत्त समितीला वाचून दाखविण्यात आले. मागील आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नियोजित कामांच्या यादीतील प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच २०२५-२६ या आर्थिक वर्षात होणाऱ्या खर्चाचे नियोजन समितीसमोर सादर करण्यात आले. गत तीन वर्षांतील वैद्यकीय उपचार व सोयी-सुविधांवर झालेल्या खर्चाचा विभागीय आयुक्त श्रीमती सिंघल यांनी आढावा घेतला, त्या म्हणाल्या की, ज्या बाबींसाठी निधी प्राप्त झाला आहे, त्याच बाबीवर तो खर्च करण्यात यावा, इतर बाबींवर खर्च करु नये. रुग्ण कल्याण नियामक समितीला प्राप्त होणाऱ्या निधीतून रुग्णालयाच्या देखभाल व दुरुस्तींची कामे करावीत. सीएसआर फंड उपलब्ध करून देणाऱ्या विविध संस्था यांच्याकडून रुग्णालय व रुग्णहिताच्या दृष्टीने आवश्यक सेवा-सुविधा, उपाययोजना करुन घ्याव्यात. आगामी पावसाळा लक्षात घेता अनेक सुविधा तसेच देखभाल व दुरुस्तींच्या कामांचे सुयोग्य नियोजन करून अत्यावश्यक कामे प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावीत. तात्पुरत्या सुधारणा करू नयेत, कायमस्वरूपी तोडगा काढून सर्व आरोग्य सुविधांची तजवीज करुन ठेवावी. रुग्णालयात वीज पुरवठा चोवीस तास सुरु राहण्यासाठी विद्युत विभागाने नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याचे काम तात्काळ पूर्ण करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त सिंघल यांनी यावेळी दिले.



## रुग्ण कल्याण नियामक समितीची सभा संपन्न



आमदार सौ. खोडके म्हणाल्या की, सुपरस्पेशॉलिटी रुग्णालयाचे अद्ययावतीकरण करण्यासाठी फेज-३ मधील विकासकामांचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाकडे प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये फेज - ३ अंतर्गत गॅस्ट्रॉलॉजी, लिव्हर ट्रान्सप्लाँट विभाग, कान-नाक-घसा व त्वचा आजारासंदर्भातील युनिट सुरु करण्यासाठी त्यांच्याकडून सर्वोतोपरी प्राधान्य दिले जाणार असल्याचे आमदार सौ. खोडके यांनी यावेळी सांगितले. फेज-३ अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या विभागांसाठी आयटीआय नजीकची जागा नियोजित करण्यात आली असल्याने तेथील कामांसंदर्भात आवश्यक नियोजन, आराखडा तयार करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना दिल्या. अमरावती विभागातून येणाऱ्या सर्व गरजू, गरीब रुग्णांना आवश्यक वैद्यकीय उपचार व सोयी-सुविधा प्राधान्याने पुरविण्यात याव्यात, अशी सूचना त्यांनी रुग्णालय प्रशासनाला केली.

रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी मागील सभेचे इतिवृत्त सादर करून खर्चाचे अंदाज पत्रक मांडले. त्यास समितीच्या वतीने मान्यता देण्यात आली. यावेळी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल च्या फेज-१ व फेज-२ मध्ये सुरु असलेल्या युरोलॉजी, किडनी ट्रान्सप्लांट, नेप्रोलॉजी, पेडियाट्रीक विभाग तर फेज२-मध्ये न्युरो सर्जरी, कार्डियाक विभाग, कॅन्सर विभाग येथे रुग्ण संख्या वाढत असल्याने प्रत्येक विभागातील खाटांची संख्या वाढविणे व आवश्यक वैद्यकीय संसाधने पुरविण्याची गरज असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांनी दिली. त्यावर समितीने सकारात्मकता दर्शवित प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सुचविले. खाटांची संख्या वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन समितीने यावेळी दिले. परिचारीकांची रिक्त पदे रोजंदारी पध्दतीने भरण्याची सूचना यावेळी करण्यात आली.

# राज्यातील सर्व कार्यालयांत हिंदी-इंग्रजीसोबत मराठी भाषेचा वापर बंधनकारक

## राज्य शासनाचा आदेश

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२७अमरावती**

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांत हिंदी, इंग्रजीसह मराठीचा वापर करणे बंधनकारक असल्याचा आदेश राज्य सरकारने काढला आहे. यासंबंधी सरकारने परिपत्रक जारी केलं आहे. शासनाच्या या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणीची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे असणार आहे.केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील सर्व कार्यालयात मराठीचा वापर करण्यात यावा. त्यासंबंधी संबंधित कार्यालयांनी दर्शनी ठिकाणी सूचनाफलकावर तसे स्वयंघोषणापत्र लावणे बंधनकारक करण्यात आलं आहे. राज्यातील राष्ट्रीय बँका, दूरध्वनी, टपाल, विमा, रेल्वे, मेट्रो, मोनो-रेल, विमान प्रवास, गॅस, पेट्रोलियम इत्यादी सेवा पुरविणारी कार्यालये, केंद्र शासनाची अन्यकार्यालये आदी ठिकाणी त्रिभाषा सूत्रानुसार कार्यवाहीं नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने हा आदेश काढला. केंद्र आणि राज्य सरकारच्या कार्यालयात मराठी भाषेचा वापर करण्यात येतो किवा कसे याबाबत पडताळणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर असेल. तसेच याबाबतचे स्वयंघोषणापत्र संबंधित कार्यालयाकडून विहित नमुन्यात जिल्हाधिकारी घेणार आहेत. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर पालकमंत्री किवा लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकांना संबंधित केंद्र शासनाच्या कार्यालयातील प्रमुखांना आमंत्रित करून त्रिभाषी सूत्रानुसार मराठी भाषेच्या वापराबाबत त्यांच्यामध्ये जागरुकता निर्माण करावी असं राज्य सरकारने आदेशात म्हटलं आहे.

### पीआयच्या अंतर्गत बदल्यांचेही सीपींनी दिले संकेत

# ३१ मे पूर्वी होणार ३७५ पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदल्या

## गुन्हे शाखेतील ६१ कर्मचार्यांचाही खांदेपालट होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

अमरावती शहराचे पोलीस आयुक्तपद स्वीकारल्यानंतर सीपी अरविंद चावरिया यांनी आता आपल्या विशिष्ट शैलीत कामाकाजाचा सुरूवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून सीपींनी ३१ मे पूर्वी पोलिस आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांच्या जनरल व विनंती बदली करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. विशेष म्हणजे सीपी चावरीया यांनी आयुक्तालयातील पोलिस निरिक्षकांच्या अंतर्गत बदलीचे संकेत दिले असून गुन्हेशाखेतील ६१ कर्मचाऱ्यांचा देखील खांदेपालट करण्याचा निर्णय सीपींनी घेतला आहे. त्यामुळे आता सर्वांचे लक्ष या गोष्टीकडे लागले आहे की गुन्हेशाखेत कोण राहील आणि कोणते नवीन चेहरे दिसतील. सीपी अरविंद चावरीया हे शुक्रवार ते रविवार या कालावधीत सीपी चावरिया सुट्टीवर होते आणि आज सोमवार २६ मे रोजी रूजू होताच सीपी चावरीया यांनी मुख्यालयाच्या डीसीपीकल्पना बारवकर यांच्याकडून पोलिस आयुक्तालयातील कर्मचाऱ्यांच्या जनरल व विनंती बदलीची माहिती घेतली. सीपी चावरिया यांच्या मते आतापर्यंतच्या आढाव्यात सुमारे २०० कर्मचारी सामान्य बदल्यांसाठी पात्र आढळले असून १७५ कर्मचाऱ्यांनी विनंतीवर आधारित बदल्यांसाठी अर्ज सादर केले आहेत. मुख्यालयाच्या डीसीपी कल्पना बारवकरयांच्या माध्यमातून एक-दोन दिवसांत म्हणजे ३१ मे पूर्वी गुन्हे शाखेतील कर्मचाऱ्यांसह इतर पोलिस कर्मचाऱ्यांच्या बदलीचे सत्र पूर्ण करण्याचे निर्देश सीपी चावरीया यांनी डीसीपी कल्पना बारवकर यांना दिले. य व्यतिरिक्त सीपी चावरीयांनी पोलि आयुक्तालयात कार्यरत असलेल्यापोलिसांच्या देखील अंतर्गत बदल्या करण्याचे संकेत दिले आहे. त्यामुळे गुन्हेशाखा, वाहतुक शाखेसह कोणत्या ठाण्याचे ठाणेदार कायम राहतात, कोणते ठाणेदार नवीन होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### गुन्हे शाखेत ३७ पदे मंजूर, प्रत्यक्षात ६१ कार्यरत

पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखेसाठी एकूण ३७ पदे मंजूर आहेत. मात्र, सध्या गुन्हे शाखेच्या तीन विभागांमध्ये पीआय सीमा दाताळकर, पीआय बाबाराव अवचार आणि पीआय गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वाखाली एकूण ६१ कर्मचारी कार्यरत असल्याने सीपी चावरिया यांनी गुन्हे शाखेत कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांच्या सर्व्हिस शीट तपासणी सुरू केली आहे. जे कर्मचारी कार्यक्षम आणि कामकाज उपयुक्त ठरतील, त्यांनाच गुन्हे शाखेत कायम ठेवण्यात येईल, तर इतरांची लवकरच बदली केली जाईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.-

# अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त गुरुवारी शहरात महिला मॅरेथॉन स्पर्धा

## भाजप महिला मोर्चाच्यावतीने आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती-** भारतीय जनता पार्टी अमरावती शहर जिल्ह्याच्या (महिला मोर्चा) वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी महोत्सवानिमित्त गुरुवार २९ मे २०२५ रोजी, सकाळी ०७:०० वा. 'महिला मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत महिलांना मोफत सहभागी होता येणार आहे.स्पर्धेत पहिला गट १५ वर्षाआतील, दुसरा गट १५ ते २५ वर्ष आणि तिसरा गट २५ वर्षांच्या वरील युवती-महिलांचा राहिल. मॅरेथॉनचा मार्ग-राजकमल चौक येथून प्रारंभगांधी चौक, साबणपुरा चौकी, शयाम चौक, राजकमल चौक असा राहिल.



स्पर्धेसाठी सूचना/ संमती :स्पर्धेत भाग घेण्यासाठी वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असणे गरजेचे आहे.

- सर्व खेळाडूंनी योग्य क्रीडा गणवेशात यावे.

- आयोजकांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत स्पर्धकाच्या वैद्यकीय उपचाराची व्यवस्था करण्याचा अधिकार आहे.

- स्पर्धकांनी कार्यक्रमाच्या दिवशी वैध ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

- कसलीही नोंदणी प्रवेश घेतली जाणार नाही.

आयोजक कोणत्याही बदल, विलंब किवा स्पर्धा रद्द करण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवू शकतात.

- स्पर्धेदरम्यान आयोजकांनी घेतलेले फोटो/व्हिडिओ प्रचारासाठी वापरण्यात येऊ शकतात. स्पर्धकांनी ट्रॅक/मार्गावर दिलेले सर्व नियम पाळणे अनिवार्य आहे.

समाप्तबक्षीस प्रथम द्वितीय तृतीय देण्यात येईल आणि रोख रक्कम तसेच प्रमाणपत्र व मेडल देण्यात येईल.

- आयोजक कोणत्याही वैयक्तिक वस्तू गहाळ झाल्यास जबाबदार राहणार नाहीत.

मी या मॅरेथॉनमध्ये स्वतःच्या जबाबदारीने सहभागी होत असून, आयोजक किवा संबंधित कोणत्याही व्यक्तीला कोणतीही वैयक्तिक दुखापत, अपघातकिवा नुकसानीस जबाबदार धरणार नाही.

# मुंबईत्तील वाईट हवामानामुळे अमरावतीत लेट आगमन

## सूर्यास्त झाल्याने फ्लाईट मुक्कामी थांबविण्याचा निर्णय

### आज दुपारी १२ वाजता घेतले मुंबईकडे उड्डाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती :**

मुंबईत सोमवारला दिवसभर पडलेला मुसळधार पाऊस आणि ढगाळी वातावरणामुळे दाणादाण उडाली असताना या वाईट हवामानाचा फटका मुंबई-अमरावती फ्लाईटला बसला. नियोजित वेळेपेक्षा तब्बल दोन तास विलंबाने सायंकाळी ५.३० वाजता मुंबईवरून अमरावती विमानतळावर फ्लाईट पोहचली आणि लगेच प्रवासी घेवून निघणार होती. मात्र फ्युएल ट्रक चिखलात फसला अन् विमानापर्यंत पोहचू शकला नाही. त्यामुळे सोमवारची रिर्टन मुंबई फेरी रद्दच करण्यात आली असून प्रवाशांना परत जावे लागले. त्यामुळे अमरावती विमानतळावर विमान मुक्कामी होते.

सोमवारला दिवसभर मुंबई जोरदार पाऊस सुरु होता. वाईट हवामानामुळे रस्ते, रेल्वे आणि विमान वाहतुकीला मोठा फटका बसला. त्याचाच परीणाम म्हणजे मुंबईवरून दुपारी ३.३० वा. पोहचणारी फ्लाईट अमरावतीत सोमवारला सायंकाळी ५.३० वा. सुमारास पोहोचली. वाईट हवामान पाहता, सूर्यास्त होण्यापूर्वी लगेच अमरावतीवरून मुंबईकडे हि फ्लाईट निघणार होती. दरम्यान विमानात इंधन भरण्याची प्रक्रि या सुरु झाली. यासाठी विमानतळामध्येच एका बाजुला असलेला फ्युएल ट्रक सोमवारला झालेल्या पावसामुळे चिखलामध्ये अडकला. हा ट्रक तत्काळ बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र प्रयत्न करता करताच सूर्यास्त झाला आणि गणित बिघडले. अमरावती विमानतळावर नाईट लँडींग आणि उड्डाणही सुविधा नाही. फ्युएलट्कचिखलातून बाहेर निघेपर्यंत सूर्यास्त झाला होता. त्यामुळे सोमवारची मुंबईला परत जाणारी फ्लाईट रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे सोमवारला मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांना परत जावे लागले. आता ही फ्लाईट आज मंगळवारला सकाळी १२ वाजता मुंबईला उड्डाण भरले त्याची माहिती सर्व प्रवाशांना देण्यात आली आहे.




# गुरुवार पासून जिल्ह्यात विकसित कृषि संकल्प अभियान, जून पर्यंत करणार जनजागृती

## डॉ. के.पी. सिंह यांची माहिती


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती,**

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली अंतर्गत भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या तफे संपूर्ण भारत देशात खरीप हंगामापूर्वी शेतक-यांपर्यंत आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची जनजागृती गावोगावी जाऊन करण्यासाठी विकसित कृषीसंकल्प अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे अभियान २९ मे ते १२ जून २०२५ या कलावधीत कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापुर (बडनेरा), जिल्हा अमरावतीच्या कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यात येणार आहे.अमरावती जिल्ह्यातील श्रम साधना, अमरावती संचालित कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापुर (बडनेरा), जिल्हा अमरावती



कार्यक्षेत्रातील, अमरावती, भातकुली, नांदगाव खंडेश्वर, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, मोर्शी व वरुड तालुक्यातील ९० गावांमध्ये या अभियाना दरम्यान विविध तांत्रिक मार्गदर्शन शिबिरे, तांत्रिक चर्चासत्रे, प्रात्यक्षिके, शासकीय योजनांची माहिती, नैसर्गिक शेती, ड्रोन प्रात्यक्षिके, जनावरांचे व्यवस्थापन, जैविक शेतीचे महत्व, बीज प्रक्रिया, जैविक खते व कीडनाशकाचासंतुलित वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन, उत्पन्न वाढीसाठी एकात्मिक पीक व्यवस्थापन, कृषी तंत्रज्ञान, बियाणे उगवण क्षमता प्रात्यक्षिके आदि कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कलावधीत



कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापुर (बडनेरा), जिल्हा अमरावती येथील कृषी शास्त्रज्ञांच्या दोन टिम सोबत भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे शास्त्रज्ञ, कृषी विभागाचे अधिकारी, आत्मा चे बीटीएम, शेतकरी उत्पादक कंपन्याचे प्रतिनिधी, इफको कंपनी, कोरोमंडल इंडिया लिमिटेड व प्रगतिशील शेतकरी प्रत्यक्ष कृतीतून कृषी तंत्रज्ञान माहिती व गावातूनप्रत्यक्ष संवाद साधणार आहेत. यामध्ये खरीप हंगामातील पिकांना तसेच पशूधनासाठी उपयुक्त असलेले तंत्रज्ञान सांगणे, यामध्ये माती-पाणी परीक्षण त्यानुसार खत व्यवस्थापन, मृदा आरोग्य पत्रिका, कीड व्यवस्थापन, जैविक शेती, नैसर्गिकशेती, शेतीमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर, ड्रोन द्वारा फवारणी आदि कृषि विभागाच्या योजना शेतक-यांपर्यंत पोहचविल्या जाणार आहेत. तरी शेतकरी बांधवांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा व बहुसंख्येने हजर राहावे असे आवाहन कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. के.पी. सिह यांनी केले आहे.-

# बाळासाहेब ठाकरे आज असते तर पंतप्रधान मोदींची गळाभेट घेतली असती

## ऑपरेशन सिंदूरवरून अमित शाह यांचं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७नागपूर –** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज नागपूरच्या दौऱ्यावर असताना त्यांनी जाहीर सभेला संबोधित करत असताना ऑपरेशन सिंदूरवर भाष्य केले. तसेच यानिमित्ताने शिवसेनेवरही (ठाकरे) टीका केली. ऑपरेशन सिंदूरनंतर याची माहिती जगभरातील देशांना कळावी म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वपक्षीय खासदारांचे शिष्टमंडळ विविध देशात पाठविण्याचा निर्णय घेतला. हे खासदार पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा उघड करत आहेत. पण शिवसेनेच्या (ठाकरे) एका नेत्याने म्हटले की, ही कुणाची वरात जात आहे.अमित शाह पुढे म्हणाले, मला समजत या उद्धव सेनेला झाले तरी काय? एकेकाळी हा बाळासाहेब ठाकरेंचा पक्ष होता. आज बाळासाहेब ठाकरे असते तर ऑपरेशन सिंदूरसाठी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची गळाभेट घेतली असती. पण उद्धव सेना सर्वपक्षीय खासदारांच्या शिष्टमंडळाला वरात म्हणतो. ज्यात त्यांचेही खासदार विदेशात गेले आहेत. अमित शहा यांनी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये एका कार्यक्रमात हजेरी लावली होती. त्याप्रसंगी ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पंतप्रधान मोदींनी हे सिद्ध केले की, हा नवा भारत आहे. २०४७ साली आपल्याला विकसित भारत तर बनायचे आहेच, पण असाही भारतही बनवायचा आहे, ज्याच्या विरोधात कुणाचीही डोळे वटारून पाहण्याची हिंमत व्हायला नको, असेही अमित शाह म्हणाले.



### ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्टलाही यश

ऑपरेशन सिंदूरसह भारतात ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट सुरू होते, असे अमित शाह म्हणाले. छत्तीसगडमध्ये ५ हजार फूट उंचीवर असलेल्या नक्षलवाद्यांच्या तळांना सीआरपीएफ, छत्तीसगड पोलीस आणि बीएसएफने संयुक्तरित्या कारवाई करत उध्वस्त केले. ३१ नक्षलवादी मारले गेले. त्यानंतर पुन्हा ३६ नक्षली मारले गेले. कैक नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली, काहींना अटक झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या भूमीत आज मी जाहीर करतो की, ३१ मार्च २०२६ रोजी देशाच्या भूमीतून नक्षलवाद समाप्त झालेला असेल, असेही त्यांनी जाहीर केले.

# हिंदू राष्ट्र निर्मितीसाठी पावले उचलावीत-आ. टी. राजासिंह

## सनातन राष्ट्र शंखनाद; अमरावतीतून २०० हिंदूप्रेमी सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती १४**
संत-गुरुजन नेहमी सांगायचे, 'आगामी काळ युद्धाचा आहे. त्या युद्धात विजय मिळवण्यासाठी, ते युद्ध लढण्यासाठी प्रत्येक हिंदूने तयार होण्याची आवश्यकता आहे. पहलगामच्या हल्ल्यात धर्म विचारून माणसे मारली गेली. पूर्वीही औरंगजेब असो, अकबर असो किंवा इतर अनेक शत्रूंनी हिंदूंचे नाव विचारून, धर्म विचारून त्यांचे धर्मांतर केले. जे धर्मांतर करत नव्हते, त्यांना मारले गेले. आज त्याचेच बिघडलेले वंशज त्यांच्याच मार्गदर्शनावर चालत आहेत. अशा प्रवृत्तीचे लोक केवळ पहलगाममध्येच नाही, तर प्रत्येक राज्यात, प्रत्येक जिल्ह्यात लपलेले असू शकतात. त्यामुळे हिंदूंनी आपल्या मुलांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण द्यायला हवे. येथून जाण्यापूर्वी हिंदूंनी आगामी काळात भारताला हिंदू राष्ट्र बनवण्यासाठी आवश्यक ते पाऊल उचलण्याचे आवाहन



तेलंगणा येथील भाजपचे आमदार टी. राजासिंह यांनी केले. सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते.

गोव्याच्या पवित्र भूमीत 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले नगरी येथे सुरू असलेल्या 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचा आणि भक्तिमय समारोप झाला. भारतासह जगभरातील २३ देशांतून आलेले सुमारे ३० हजार हिंदू धर्मप्रेमी आणि साधक यांनी महोत्सवात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून हिंदू एकात्मतेचे दर्शन घडवले. यामध्ये अमरावती जिल्ह्यातून २०० पेक्षा अधिक हिंदू धर्म प्रेमींनी सहभाग घेतला होता. हा महोत्सव म्हणजे हिंदु राष्ट्र स्थापनेच्या दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल होते.

या महोत्सवात विविध आध्यात्मिक, राष्ट्रहितकारी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महत्त्वाचे म्हणजे भारताच्या विजयासाठी, तसेच भारतीय सैन्य, सनातन धर्मप्रेमी आणि राष्ट्र रक्षणासाठी आयोजित शतचंडी यज्ञ, महाधन्वंतरी यज्ञ केला. यासाठी तामिळनाडू येथून ३५ पुरोहित आले होते. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळा आठवले यांच्या हस्ते सनातन धर्म ध्वजाचे जयघोषात आरोहण करण्यात आले. महोत्सवात कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचा जीवनपट कीर्तनाच्या माध्यमातून उलगडला.या महोत्सवात श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी, अ. भा. आखाडा परिषदेचे अध्यक्ष महंत रवींद्र पुरी महाराज, अयोध्या हनुमान गढी येथील महंत राजू दास, श्रीक्षेत्र तपोभूमी (कुंडई, गोवा) पिठाधिश्वर पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामी, सनातन बोर्डचे प्रणेते देवकीनंदन ठाकूर महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, माजी केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहुरकर तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णू शंकर जैन आदी अनेक मान्यवर वक्त्यांनी अध्यात्म, राष्ट्र आणि धर्म आदी विविध विषयांवर हजारो हिंदूंचे प्रबोधन केले. या वेळी मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते.

# मित्राच्या पत्नीचे चाकूच्या धाकावर अपहरण

## हैद्राबादमध्ये नेऊन आठ दिवस केला अत्याचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
मित्राच्या पत्नीचे चाकूच्या धाकावर अपहरण करून तिला हैद्राबाद येथे नेऊन तिच्यावर आठ ' दिवस सतत अत्याचार केल्याची धक्कादायक घटना नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. याघटनेत नागपुरी गेट पोलिसांनी रविवारी पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला. फैजान खान अन्नू खान (वय २४, - रा. अन्सारनगर) असे गुन्हा दाखल झालेल्या युवकाचे नाव आहे.पीडित महिलेचा पती व फैजान हे मित्र आहेत. त्यामुळे फैजानची तिच्या घरी नेहमी ये-जा राहत होती. तसेच पती घरी नसल्यावर तो घरी येत होता. १० मे रोजी फैजान हा पीडितेच्या घरी गेला आणि पती घरी आहे का, असे विचारले. तेव्हा पीडिताने ते कामावर गेल्याचे सांगितले असता तो घरात आला आणि पीडितेजवळ बसला.कंबरेतला चाकू काढून तिला धाक दाखवून तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला.तिने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता त्याने तिच्या मुलीला जीवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे ती घाबरली.



त्यानंतर त्याने तिच्याशी बळजबरी केली आणि कोणाला सांगितले तर मुलीला जीवे मारण्याची धमकी देऊन निघून गेला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता तो परत आला आणि तिला बळजबरीने हैद्राबादला घेऊन गेला. तिथे दोघे एका खोलीत मुक्कामी होते. आठ दिवस तिच्यावर त्याने सतत अत्याचार केला. दरम्यान फैजानजवळचे पैसे संपल्यानंतर तो तिला घेऊन विनातिकीट मूर्तिजापूर आला आणि स्वतःचा मोबाईल तिला देऊन त्याची बॅग घेऊन तो निघून गेला. त्यानंतर ती अमरावती आली आणि आपल्या परिचित महिलेच्या घरी जाऊन तिने घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर तिने पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याघटनेत पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून फैजानचा शोध सुरू केला आहे.

# भूमिअभिलेखचे कर्मचारी बेमुदत संपावर

## सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, रिक्त जागा भराव्या यासह विविध मागण्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती–** सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, यासह विविध मागण्यांसाठी विदर्भ भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेद्वारा १५ मेपासून काळी फीत लावून कामकाज सुरू करण्यात आले होते. या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात सोमवार, २६ मेपासून कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत.

भूमी अभिलेख विभागात राबवण्यात येणारे विविध ऑनलाइन प्रकल्प आणि वाढलेली मोजणी प्रकरणाची आवक संख्या पाहता, राज्यातील सर्व भूमी अभिलेख कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व रिक्त पदे त्वरित भरावी, ही मागणी असताना याकडे शासन, प्रशासनाद्वारा कोणतीही सकारात्मक कार्यवाही अद्याप झालेली नाही, असे निवेदनात नमूद आहे. यापूर्वी जमाबंदी




आयुक्त व संचालक, अभिलेख यांना अमरावती येथे संघटनांचे प्रतिनिधींद्वारा निवेदन देण्यात आले होते. या सर्व मागण्या प्रलंबित आहेत. त्यामुळे कर्मचारी संघटनेद्वारा आता बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतल्याचे संघटनेचे अध्यक्ष बाळू उंबरकर यांनी सांगितले होते. त्यानुसार कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. यावेळी संघटनेचे एस. आर. धानोरकर, एम. बी. बहादुरकर, एन. व्ही. कारंजकर, सी. पी. गोळे, सुनील कळमकर, एम. आर. कडू, विशाल गुडधे, भूषण गोमकाळे, अमोल हिवसे, अर्चना चव्हाण, नीलेश दामधार आदी कर्मचारी उपस्थित होते.

# नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता बसवराजूवर पोलिसांकडून परस्पर अंत्यसंस्कार, प्रशासनाकडून न्यायालयाची दिशाभूल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७गडचिरोली : –** भारतीय कम्युनिस्ट पार्टीचा (माओवादी) सरचिटणीस तसेच नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता नंबाला केशव राव उर्फ बसवराजू याच्यासह इतर मृत नक्षलवाद्यांवर नारायणपूर पोलिसांनी परस्पर अंत्यसंस्कार केल्याने कुटुंबीयांनी आक्षेप घेतला आहे. बसवराजूच्या कुटुंबीयांकडून त्याचा मृतदेह ताब्यात देण्याची मागणी करणारी याचिका आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. शनिवार, २४ मे रोजी याचिकेवर झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायाल्याने मृतदेहासाठी छत्तीसगड पोलिसांकडे मागणी करा, असे सांगून यासंदर्भातील दोन याचिका निकाली काढल्या. मात्र, छत्तीसगड पोलिसांनी परस्पर अत्यसंस्कार करीत न्यायालयाचा अवमान केल्याची चर्चा आहे.

२१ मे रोजी छत्तीसगडमधील अबुझमाड जंगल परिसरात झालेल्या चकमकीत नक्षलवाद्यांचा सर्वोच्च नेता नंबाला केशव राव उर्फ बसवराजू ठार झाला. त्याच्यासोबत आणखी २६ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात पोलिसांना यश आले. नक्षलवाद्यांच्या इतिहासात पहिल्यांदाच इतका मोठा नेता चकमकीत ठार झाला. दरम्यान, बसवराजूचा मृतदेह ताब्यात





घेण्यासाठी कुटुंबीयांनी धडपड चालवली. एरवी पोलीस प्रशासन ठार झालेल्या नक्षलवाद्यांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करतात. पण बसवराजूच्या प्रकरणात उशीर होत असल्याने त्याच्या नातेवाईकांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात दोन याचिका दाखल करून मृतदेह ताब्यात देण्याची विनंती केली. यावर शनिवारी झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने दोन्ही पक्षाची बाजू ऐकून घेत याचिकाकर्त्यांना मृतदेहासाठी छत्तीसगड पोलीस प्रशासनाकडे जाण्याची सूचना केली. यावेळी छत्तीसगडचे महाधिवक्ता यांनीदेखील शनिवारपर्यंत शवविच्छेदन आणि तपासणी पूर्ण होणार असल्याचे सांगून लवकरच मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करणार, असे न्यायालयात स्पष्ट केले. त्यामुळे न्यायालयाने दोन्ही याचिका निकाली काढल्या. परंतु आज, २६ मे रोजी नारायणपूर पोलिसांनी बसवराजूसह काही नक्षलवाद्यांचे मृतदेह नातेवाईकांना न देता त्यांच्यावर परस्पर अंत्यसंस्कार केले. यावेळी पोलिसांनी बसवराजूचे कुटुंबीय, सामाजिक कार्यकर्ते व माध्यम प्रतिनिधींना तिथे येऊ दिले नाही. बसवराजूचे कुटुंबीय या विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहेत. पोलिसांनी उच्च न्यायालयाच्या आदेशाचे व मानवाधिकाराचे उल्लंघन केले, असा आरोप बसवराजूचा भाऊ राम प्रकाश यांनी केला. सामाजिक कार्यकर्त्या बेला भाटिया यांनीदेखील, पोलिसांनी नियमभंग केला असून याविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशारा दिला.

# शहरात रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ते...जेट पॅचरने डांबरी पॅचेस, आवश्यक तिथे मुरूम टाकून खड्डे बुजवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**
अमरावती व बडनेरा शहरामध्ये विविध रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे झालेले आहेत. या खड्ड्यांमुळे अनेक लोकांना पाठीच्या हाडांचे आजार उद्भवले आहेत. अनेकांच्या वाहनांचे नुकसान होत आहे, दर दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी या खड्ड्यांमुळे वाहनांचे अपघात होत आहेत, असे सांगत जेट पंचरने डांबरी पॅचेस लावण्यात यावे तसेच आवश्यक तिथे मुरूम टाकून खड्डे बुजविण्यात - यावेत, अशी मागणी युवा स्वाभिमान पार्टीतर्फे महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली.नुकतेच पावसाने लावलेल्या जोरदार हजेरीमुळे रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी भरल्याने वाहन चालवणाऱ्यांना खड्डा माहिती पडत नाही. ज्यामुळे दर दिवशी मोठे अपघात होत आहेत. रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता आहे, हेही ओळखणे कठीण झाले आहे. ज्यामुळे शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, महिला वर्ग, पुरुष वर्ग तसेच ज्येष्ठ नागरिकांची मोठी ओरड सुरू आहे. वडाळी ते विद्यापीठ जाणारा डेंटल कॉलेज समोरील रस्ता, वडाळी बस स्टॉप ते ऑक्सिजन पार्क, महादेव खोरी उड्डाणपुल ते महादेव मंदिराला जाणारा रस्ता, मंगलधाम कॉलनीचा विठ्ठल रुक्मिणी मंदिर ते गणेशा हिल्सपर्यंतचा मुख्य रस्ता तसेच अंतर्गत रस्ते तर खूपच जास्त खराब झालेले आहेत. नागरिकांमध्ये अमरावती महानगरपालिके प्रति असंतोष निर्माण झाला आहे, असे महापालिका आयुक्तांच्या निदर्शनात आणून देण्यात आले. शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांना जेट पंचरने डांबरी पॅचेस बसवून तसेच आवश्यक तिथे मुरूम टाकून बुजविण्याची कारवाई करावी, असे युवा स्वाभिमान पार्टीचे माजी शिक्षण सभापती व माजी नगरसेवक आशिषकुमार गावंडे यांनी नागरिकांसह महापालिका प्रशासक सचिन कलंत्रे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. त्यावर मनपा आयुक्तांनी



सकारात्मक भूमीका घेत रस्ते बांधकाम विभागातील संबंधीत अधिकाऱ्यांना रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे आदेशित केले. याप्रसंगी अमोल पवार, सुधीर फेंडर, संजय दाबणे, तुकाराम चव्हाण, अमोल टेकाळे, महेंद्र शेळके, शीतल पवार, प्रफुल बोरेकर, अक्षय झोड, अनुप थोरात, सुरेंद्र तायडे, पंकज चोपडे, विजय जाधव, रणजीत मेश्राम, राजू बैस, भुवन म्हैसकर, स्वानंद पहरकर, अरूणा कुकडे, अरूणा अलोने, छाया धंदर, उपस्थित होते.

# राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार सोहळा उत्साहात

## टाकरखेडा संभू येथे शेतकरी मित्रांचा गौरव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ टाकरखेडा शंभू**

राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, अमरावती आणि आयडियल ग्री सर्च प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप पूर्व शेतकरी संवाद आणि राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार वितरण सोहळा टाकरखेडा संभू येथे मोठ्या उत्साहात पार पडला. पौर्णिमा ग्रो बायोटेकच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजी सरपंच दीपक पाटील यांनी भूषवले.

कार्यक्रमात रूपाली वसंत ठाकरे (मुख्यालय: टाकरखेडा संभू) यांचा 'उत्कृष्ट शेतकरी मित्र कृषी अधिकारी' म्हणून, संतोष शेंडे, अध्यक्ष, भातकुली तालुका मराठी पत्रकार संघ यांचा 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार', राजाभाऊ लुंगे (अमरावती) यांचा कृषिपूरक उद्योगासाठी, तसेच सुरेंद्र लांजेवार (पोहरा पूर्णा) यांचा उत्कृष्ट तीफणकरी म्हणून गौरव केला.

या वेळी राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सरपंच रश्मी देशमुख, उपसरपंच प्रदीप शेंडे, कृषी पर्यवेक्षक अमोल सराड, वैभव कुमार जाधव, भिवसन बकाल, गणेश बकाल, दिलीप काळे, भैय्यासाहेब निचळ, ग्रा. सदस्य सोनाली जामठे, कल्याणी सवाई, विद्या शेंडे, छाया सवाई, राहुल तायडे, विवेक मोहोड, सौरभ मानकर, अतुल भुस्कडे, गजानन कडू शेतकरी उपस्थित होते.प्रास्ताविक पौर्णिमा सवाई यांनी केले. सूत्रसंचालन गोपाल कडू यांनी केले. आभार तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले यांनी केले.

# जि.प.विश्रामगृह उघडून न दिल्याने ऐनवेळी आरटीओ शिबिर झाले रद्द

## कॅम्पसाठी आलेले विद्यार्थी व नागरिक आल्या पावली गेले परत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७चांदुर बाजार**

मागील अनेक वर्षांपासून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात चांदूर बाजार जिल्हा परिषद विश्रामगृहामध्ये आरटीओ विभागातर्फे शिबिराचे आयोजन केले जाते. या शिबिरात मोर्शी, परतवाडा, चांदूर बाजार या परिसरातील शेकडो नागरिक व विद्यार्थी आपापली रेंगाळलेली कामे पूर्ण करून घेण्यासाठी येतात. परंतु, सोमवार, २६ मे रोजी या शिबिरासाठी आरटीओ अधिकाऱ्यांसह कामानिमित्त आलेल्या नागरिकांना विश्रामगृह बंद असल्याने ऐनवेळी शिबिर रद्द करावे लागले. परिणामी विद्यार्थी, नागरिक तसेच कॅम्प घेण्यासाठी आलेल्या आरटीओ अधिकाऱ्यांना शिबिर न घेताच आल्या पावली परत जावे लागले.




आरटीओ विभागाकडून कोणताही परवाना घेताना संबंधितांना आपला अर्ज ऑनलाइन करावा लागतो. त्यानंतर आरटीओ विभागाकडून त्या व्यक्तीला तारीख, वेळ, ठिकाण दिले जाते. त्यामुळे सोमवारी चांदूर बाजार जिल्हा परिषद विश्रामगृहात अनेक व्यक्तींना त्यांच्या कामासाठी आयोजित शिबिरात बोलावण्यात आले होते. या शिबिरासाठी तारीख दिलेले व्यक्ती व आरटीओ विभागाकडून अधिकारीही जिल्हा परिषद विश्रामगृहात दाखल झाले होते. मात्र, विश्रामगृह संबंधित विभागाने उघडून न दिल्यामुळे कामानिमित्त आलेल्या नागरिकांची निराशा झाली.

आरटीओ विभागाकडून आलेल्या अधिकाऱ्यांनी याबाबत पंचायत समितीमध्ये जाऊन गटविकास अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. त्यावेळी गटविकास अधिकाऱ्यांनी पत्र आम्हाला शुक्रवारी मिळाले. तसेच विश्रामगृहातील माणूस निवृत्त झाला असून, विश्रामगृहाची चावी नसल्याचे कारण त्यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहाचे देखील बांधकाम सुरू आहे. त्यामुळे चांदूर बाजार येथे शिबिर न घेताच अधिकाऱ्यांना निघून जावे लागले. मात्र, यामुळे सर्व कामे सोडून आरटीओशी निगडीत कामांसाठी आलेल्यांची चांगलीच गैरसोय झाली. मजुरी पाडून कामानिमित्त आलेल्या नागरिकांसह विद्यार्थ्यांना हताश होऊन वापस जावे लागले.

विश्रामगृहाची निर्मिती ही शासकीय अधिकारी, शासकीय शिबिर, जनप्रतिनिधी यांना सुविधा मिळाव्या यासाठी करण्यात आली आहे. मात्र, माणसंच नसल्याच्या नावावर अशा विश्रामगृहाचा उपयोग संबंधित विभागाचे अधिकारी स्वत:च घेत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.

विश्रामगृहाची चावीच झाली गायब ग्रामीण भागातून कामानिमित्त आलेल्या नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून गटविकास अधिकारी विश्रामगृहाची पावती फाडून घेत ते सुरू करण्यास तयार होते. मात्र विश्रामगृहाची चावी ही अधिकाऱ्यांच्या सोबत गेल्यामुळे गटविकास अधिकारी असमर्थ ठरल्याची चर्चा जोरात सुरू होती.

# शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी द्या : वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीने सर्वानमुते ठराव करून शासनाला दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७वरुड**

वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देऊन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, असा सर्वानुमते ठराव करून तो शासनाला पाठवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ठरावासह निवेदन सोमवार, २६ मे रोजी वरुडच्या तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवण्यात आले.



शेतकऱ्यांना फडणवीस सरकारच्या काळात कर्ज माफी देण्यात आली. ती कर्ज माफी अपूर्ण स्वरूपाची व दोषपूर्ण होती. काही शेतकऱ्यांनी कर्ज माफीसाठी अर्ज केले, ते पात्र ठरले. परंतु, त्या शेतकऱ्यांची कर्ज माफीची रक्कम आजवर जमा झालेली नाही. परिणामी सर्व शेतकरी शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे कर्ज माफीमध्ये अडकले. त्या नंतर ठाकरे सरकारच्या काळात पुन्हा शेतकऱ्यांना कर्ज माफी दिली गेली. तीसुद्धा अपूर्ण व दोषपूर्ण होती. शेतकऱ्यांनी १ एप्रिल २०१५ नंतर कर्ज उचल केली. त्याच शेतकऱ्यांना कर्ज माफीसाठी पात्र ठरवले होते. त्यामुळे फडणवीस सरकारच्या काळात कर्जमाफीतून सुटलेले बरेच शेतकरी २०१५ पूर्वीचे असल्याने ठाकरे सरकारच्या काळात कर्ज माफीकरिता अपात्र ठरले. एप्रिल २०१५ नंतरचे शेतकरी पात्र ठरूनही कर्जमाफीपासून वंचित राहिले.


फडणवीस व ठाकरे सरकारचे काळातील शेतकरी कर्जमाफी शेतकऱ्यांच्या सोईची झाली नसल्याने व शासनाने कर्ज माफीची घोषणा केली व शेतकऱ्यांची कर्ज भरण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने बरेच पात्र लाभार्थी यांनी आजपर्यंत कर्ज भरले नाही. त्यामुळेच फडणवीस सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्ज माफी देऊन शेतकऱ्यांनाच सातबारा कोरा करावा, अशी मागणी बाजार समिती संचालक मंडळाने निवेदनात केली आहे. याप्रसंगी कृउबासचे सभापती नरेंद्र उर्फ बबलू शेषराव पावडे, उपसभापती बाबाराव मांगुळकर, संचालक राजेश गांधी, वनराज कराळे, सुजित पाटील उपस्थित होते.

# नगर परिषदची परवानगीच नसताना चौथ्या मजल्याचे बांधकाम

## बांधकामावरील ३४ वर्षीय कामगाराचे मृत्यू प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७दर्यापूर**

शहरातील बनोसा मार्केटमधील दुकानाचे बांधकाम सुरू असताना इलेक्ट्रिक शॉक लागून चौथ्या मजल्यावरून खाली पडलेले बांधकाम कामगार गजानन सोळंके (वय ३४ ) यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. दरम्यान या इमारतीच्या बांधकामाची परवानगीच नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.



बांधकाम करताना स्थानिक नगर पालिकेतून बांधकाम विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. विना परवानगी बांधकाम करणे कायद्याने गुन्ह्यास पात्र आहे, असे असताना नियम पायदळी तुडवत दर्यापूर शहरात अनेक ठिकाणी बांधकामे झाली आहेत. काही ठिकाणी थातुरमातूर नोटीस बजावून पालिका प्रशासनाद्वारे कारवाई केली जाते. मात्र यात शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडतो. पर्यायाने पालिकेचे नुकसान होते. नियम पायदळी तुडवल्याने असे जीवघेणे अपघात होतात.

### केवळ तिसऱ्या मजल्यापर्यंतच परवानगी; कारवाई तर होणारच

बनोसा येथील बांधकाम मालक कानडे यांनी केवळ तिसऱ्या मजल्यापर्यंत रितसर परवानगी घेतली आहे. चौथ्या मजल्याची परवानगी नाही. अपघाताच्या घटनेनंतर पालिका अधिनियम ५४ नुसार तातडीने कारवाई करण्यात येणार आहे.

**अविनाश देशमुख,**
**नगर रचना सहायक अभियंता, नगर परिषद, दर्यापूर.**

अनेक बांधकामे विना परवानगी झालेली असताना व त्याबाबत पालिका प्रशासनाला माहिती असतानाही कारवाई का होत नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र आता एका जणाचा मृत्यू झाल्यावर पालिका प्रशासन जागे झाले असून, या बांधकाम करणाऱ्या मालकाला नोटीस बजावणार आहे. सोबतच मालकाविरोधात गुन्हाही दाखल करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# निर्णय प्रक्रियेला गती देणार : डॉ. शैलेंद्र देवळणकर यांची ग्वाही

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत पुण्यात उच्चस्तरीय बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

महाराष्ट्रातील विद्यापीठ व महाविद्यालय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आज पुणे येथील शिक्षण संचालक कार्यालयात एक महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत संयुक्त कृती समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीत २०१६ नंतर लागू झालेल्या सातव्या वेतन आयोगानुसार १०, २०, ३० वर्षांच्या पदोन्नती योजनेची अंमलबजावणी, प्रलंबित अनुकंपा प्रकरणे, ३५७ विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, गोंडवाना विद्यापीठासाठी स्वतंत्र सहसंचालक कार्यालय स्थापन करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजा रोखीकरण, २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना आणि रिक्त पदे भरण्याच्या कार्यवाहीसह इतर विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.डॉ. देवळणकर यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेतल्या व सकारात्मक भूमिका घेत आश्वासन दिले की, लवकरच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. चंद्रकांत पाटील आणि वित्त विभाग यांच्यासमवेत संयुक्त कृती समितीची बैठक घेण्यात येईल. या बैठकीत प्रत्येक विषयावर ठोस निर्णय घेण्यासाठी कार्यवाहीला गती दिली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.या बैठकीस कृती समितीचे अध्यक्ष अजय देशमुख, प्रमुख संघटक रावसाहेब त्रिभुवन, मिलिंद भोसले, तसेच प्रकाश म्हसे, संदीप हिवरकर, सतीश वाघमारे, शिवराम लुटे, विजय घरत, धोत्रे, चिमूरकर, विकास मोहिते, अशोक कदम, अशोक रानवडे, दिनेश उथळे, शशिभूषण हुसे, चंद्रशेखर कदम, गोपाल सोनवणे, आनंदा अंकुश, संतोष मदने व इतर विद्यापीठ, महाविद्यालय व महासंघांचे पदाधिकारी उपस्थित होते.संयुक्त कृती समितीच्या वतीने बैठक सकारात्मक झाल्याचे सांगण्यात आले असून, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर लवकरच निर्णय अपेक्षित आहे.

# आमच्या मुलांना शिकवणार कोण ? शिक्षकांच्या मागणीसाठी पालक उच्च न्यायालयात; जिल्हा परिषदेला 'जैसे थे'चे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**

शालेय शिक्षण विभागाने नवी संचमान्यता निकष लागू केल्याने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे मंजूर झाली नाहीत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आल्याचे नमूद करीत वर्धा जिल्ह्यातील पालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली. न्यायालयाने उन्हाळी अवकाशादरम्यान तातडीने सुनावणी घेत विद्यमान शिक्षकांना 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश दिले.

या प्रकरणावर न्यायमूर्ती रोहित जोशी यांच्या अवकाशकालीन खंडपीठासमक्ष सुनावणी झाली.याचिकेनुसार, शालेय शिक्षण विभागाने १५ मार्च २०२४ रोजी संचमान्यतेचे नवे निकष लागू केले. त्यामुळे, या शैक्षणिक वर्षात अनेक शाळांना शिक्षकांची पदे मंजूर झाले नाहीत. विशेषतः २० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये वर्ग सहावी ते आठवीसाठी विज्ञान, गणित, भाषा आणि सामाजिक शास्त्र या विषयांसाठी एकही शिक्षक पद मान्य झाले नाही. यामुळे, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 'शिकवणार कोण?' असा प्रश्न पडला. या गंभीर समस्येवर उपाय शोधण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील पालकांनी



अ‍ॅड. प्रदीप क्षीरसागर यांच्यामार्फत नागपूर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. शिक्षण हक्क कायद्यानुसार, वर्ग सहावीते आठवीसाठी विषयानुसार पदवीधर शिक्षकांची नेमणूक बंधनकारक आहे. मात्र, नवीन निकषांमुळे ग्रामीण भागातील शाळांमधील शिक्षण व्यवस्था कोलमडण्याची भीती निर्माण झाली, अशी बाजू अ‍ॅड. क्षीरसागर यांनी मांडली.

यावर उच्च न्यायालयाने तातडीने सुनावणी घेत सध्याच्या शिक्षक संख्येला जैसे थे ठेवण्याचे आदेश दिले. त्यामुळे, हा निर्णय पालक आणि विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा ठरला आहे. तसेच, न्यायालयाने जिल्हा परिषदेला नोटीस बजावत २६ जून पर्यंत उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्यांतर्फे अ‍ॅड. प्रदीप क्षीरसागर यांनी बाजू मांडली.

### वर्धा जिल्ह्यातील दहा शाळा

या आदेशानुसार, वर्धा जिल्ह्यातील दहा शाळांमधील विद्यमान शिक्षक संख्या कायम राहणार आहे. यामध्ये जिल्हा परिषद शाळा काजलसारा (ता. हिंगणघाट), जिल्हा परिषद शाळा तास, जिल्हा परिषद शाळा मदनी, जिल्हा परिषद शाळा तरोडा (ता. कारंजा), जिल्हा परिषद शाळा पोरगव्हाण (ता. आष्टी), जिल्हा परिषद शाळा करंजी (भोगे), जिल्हा परिषद शाळा तारासावंगा (ता. आष्टी), जिल्हा परिषद शाळा बाबुळगाव (खोसे, ता. देवळी), जिल्हा परिषद शाळा बोरगाव (हताला) आणि जिल्हा परिषद शाळा शेगाव (कु.). यांचा समावेश आहे.

# फिनले मिलचे महाप्रबंधक अमित कुमार सिंह यांचा इन कॅमेरा कामगारांसोबत मीटिंग करायला नकार

## पत्रकारांनाही मिल मध्ये प्रवेश करण्यास मनाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अचलपूर**

अचलपूर तालुक्यातील पिल्ले मिलच्या कामगारांना मागील २२ महिन्याच्या थकित पगार दिला नाही हेच नाहीतर चालू वर्षाचा सात महिन्याचा पगार सुद्धा दिला नसल्यामुळे आता कामगार रस्त्यावर उतरले आहे.


६ सप्टेंबर २००८ ला सुरू झालेला फिल्लीमिल कोरोना काळापासून बंद झालं होतं यानंतर मेल सुरू करण्यासाठी १३ महिन्याचा उपोषण कामगारांनी केल्यानंतर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे माजी खासदार नवनीत राणा यांच्या प्रयत्नामुळे मिल सुरू झाली होती परंतु कच्चामाल नसल्याचे कारण देत पुन्हा मिल चार महिन्यातच बंद करण्यात आली. कामगारांचे थकीत पगार न मिळाल्यामुळे आतापर्यंत १६ कामगारांना आत्महत्येचा पवित्रा घ्यावा लागला.

भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या प्रयत्नाने ६ सप्टेंबर २००८ ला नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या माध्यमातून फिनले मिल सुरू करण्यात आले होते. परंतु अद्यापही हजारो कामगार बेरोजगार झाले असून त्यांना थकीत वेतन सुद्धा मिळाली नाही या अगोदर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी सुद्धा दिल्लीपर्यंत प्रयत्न केले परंतु त्यांना सुद्धा यश मिळाले नाही. सिनेमिल कामगारांसोबत चर्चा करताना पत्रकार बाहेर जा या प्रकारचा वक्तव्य मिलचे महाप्रबंधक अमित कुमार सिंह यांनी केली . महाप्रधान प्रबंधक पोलीस अधिकाऱ्यांसमोर म्हणाले आम्ही कामगारांसोबत पत्रकारांसमोर इन कॅमेरा चर्चा करणार नाही अन्यथा कोणत्याही प्रकारची चर्चा होणार नाही अशी धमकी सुद्धा दिली.

# राज्यातील अनुभवी शिक्षकांची होणार परीक्षा

## वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण एकाच वेळेस २ जून ते १२ जून पर्यंत चालणार प्रशिक्षण

**सुधीर केने**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**



शिक्षकाने आपल्या सेवेची १२ वर्षे पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी तर २४ वर्ष सेवा केल्यानंतर निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. यावर्षी हे प्रशिक्षण २ जून ते १२ जून या कालावधीत राज्यात एकाच वेळेस आयोजित करण्यात आले आहे.विशेष म्हणजे यावेळी सर्व अनुभवी शिक्षकांची परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेत पात्र न ठरल्यास गुरुजींना पुन्हा प्रशिक्षण करावे लागणार आहे.त्यामुळे तूर्तास तरी राज्यातील अनुभवी गुरुजी टेन्शनमध्ये आहे..विशेष म्हणजे यावर्षी पहिल्यांदाच प्रशिक्षणाच्या वेळी घेण्यात येणारी चाचणी आणि त्याचे गुणदान हा चर्चेचा विषय ठरत आहे. वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण चाचणीसाठी शंभर गुण, स्वाध्यायसाठी शंभर गुण, लेखी चाचणीसाठी ५० गुण तर अहवाल लेखनासाठी ५० गुण असे एकूण ३०० गुणांवर आधारित संपूर्ण मूल्यमापन होणार आहे.प्रशिक्षणा दरम्यान व नंतर अशा दोन्ही मूल्यमापन प्रक्रियेत किमान ५०% गुण मिळवणे अनिवार्य आहे.अन्यथा पुन्हा नव्याने नोंदणी करून व शुल्क भरून याचप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण करणे अपेक्षित आहे.या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण २०२०,राज्य अभ्यासक्रम आराखडा,शिक्षण हक्क कायदा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा,ऑनलाईन शिक्षण,सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार, पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापन, व्यवसाय शिक्षणासह ताण तनावाचे व्यवस्थापन मूल्यमापन,कृती संशोधन आदि वीस ते बावीस विषयांचा समावेश राहणार आहे.प्रशिक्षण काळात दर ताशीकेनंतर दहा गुणांच्या चाचणीसह दहा स्वाध्याय पूर्ण करावे लागणार आहे. यातील पाच स्वाध्याय प्रत्यक्षात प्रशिक्षण दरम्यान वर्गात पाच घटकांवर आधारित स्वाध्याय राहणार आहे.उर्वरित पाच स्वाध्याय प्रशिक्षणानंतर वैयक्तिक स्वरूपात पूर्ण करावे लागणार आहे.संपूर्ण प्रशिक्षण पूर्ण केल्यावर शेवटच्या दिवशी ५० गुणांची लेखी चाचणी घेतली जाणार आहे. यात रिकाम्या जागा भरा,जोडच्या लावा,एका वाक्यात उत्तरे द्या,टिपा लिहा,लघुत्तरी, उपयोजनात्मक व मुक्तोत्तरी प्रश्नांचा समावेश राहणार आहे.शिक्षकी सेवेत रुजू झाल्यानंतर असलेली परिस्थिती व त्यानंतर झालेले अनेक बदल यासाठी शिक्षकांनी सर्व परिस्थिती हाताळण्यासाठी सक्षम व्हावे याकरिता या प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.राज्यस्तरीय प्रशिक्षण एस सी आय आर टी पुणे येथे पार पडले. २६ ते २९ मे २०२५ दरम्यान विभाग स्तरीय व जिल्हास्तरीय टीओटी होणार आहे. त्यानंतर या प्रशिक्षणात तयार झालेले तज्ञ मार्गदर्शक २ जून ते १२ जून २०२५ या कालावधीत तालुकास्तरीय शिक्षकांना ऑफलाईन प्रशिक्षण देणार आहेत.

### राज्यात एकाच वेळी ऑनलाईन चाचणी

दहा दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणात प्रत्येक प्रशिक्षणार्थींना प्रत्येक तासिकेला हजर राहणे अनिवार्य आहे.प्रत्येक दिवशी परिपाठ नंतर आदर्श शाळांवर चर्चा होणार असून दर दिवशी पाच ताशीका होणार आहे.प्रशिक्षण पूर्व काळात पूर्व चाचणी आणि उत्तर चाचणी असणार आहे प्रत्येक घटकांनंतर दहा गुणांची बहु पर्यायी ऑनलाईन चाचणी होणार असून संपूर्ण राज्यात ही चाचणी एकाच वेळी होणार असल्याने राज्याची वेळापत्रक सारखेच राहणार आहे. विशेष म्हणजे याच किमान ५० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रशिक्षणातून दांडी मारणे या विषयाला पूर्णविराम लागणार आहे.

# आज पुन्हा .... मोर्शी तालुक्यातील विमान घिरट्या घालतांना दिसले

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये : जिल्हा प्रशासनाचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील काही भागात एक विमान भूपृष्ठाजवळ घिरट्या घालताना दिसून आले आहे. हे विमान विमान भूपृष्ठावरील जलस्त्रोतांचे पर्यवेक्षण करणारे असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले काही दिवस आधी केले होते , आज सकाळच्या सुमारास पुन्हा हेच विमान मोर्शी तालुका व आसपासच्या परिसरात घिरट्या घालतांना नागरिकांना दिसले

मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर मंडळात खेड, तळेगाव, धामणगाव आणि आष्टगाव तसेच चांदूरबाजार तालुक्यातील परिसरात परिसरात आकाशातून एक विमान भूपृष्ठाजवळ घिरट्या घालताना नागरिकांना स्पष्टपणे दिसले. हे विमान जवळपास अर्धा तास या भागात घिरट्या घालत होते. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने सदर विमान भूपृष्ठावरील जलस्त्रोतांचे पर्यवेक्षण करण्यासाठी यंत्रणेकडून वापरण्यात आले आहे. या विमानाद्वारे भागातील पाण्याच्या साठ्याची माहिती घेतली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रात रेड अलर्ट! पुढील ३ तासांत ५०-६० किमी वेगाने वादळी वारे, मुसळधार पाऊस पडणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७अमरावती**



महाराष्ट्रासह तीन राज्यांत हवामान विभागाने पावसाचा रेड अलर्ट जाहीर केला आहे. २७ मे पासून विशेषतः किनारी आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात अत्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. आज मध्य महाराष्ट्रातील कोकण आणि घाट भागात अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मुंबई आणि पुण्यात मान्सून २६ मे रोजीच पोहोचला आहे. भारतीय हवामान विभागाने (खचऊ) महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकसाठी रेड अलर्ट जारी केला आहे.

पुढील ३ तासांत जिल्ह्यांमध्ये ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी वारे व मुसळधार पावसासह ताशी ५०-६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी सतर्क राहावे, असा इशारा महाराष्ट्र सरकारने दिला आहे. उत्तर अंतर्गत कर्नाटकात २७ ते ३० मे दरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तामिळनाडूमध्ये ३१ मे पर्यंत वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचे वारे सुरू राहण्याची शक्यता आहे.

केरळमध्ये २९ घरे उद्ध्वस्त झाली आहेत आणि ८६८ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. ७ मे रोजी केरळ आणि माहे येथे काही ठिकाणी अतिवृष्टी, वादळ, विजांचा कडकडाट आणि ४०-५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. २८ मे ते १ जून दरम्यान मुसळधार ते अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.


**मुंबईत आज भरती...**

मुसळधार पावसाचा अंदाजही दिला आहे. १२.१४ वाजता समुद्रात ४.९२ मीटर उंचीची पहिली भरती येईल. यावेळी समुद्रात १५ फूट उंच लाटा उसळतील. तर मंगळवारी रात्री ११:५४ वाजता ४.०८ मीटर उंचीची भरती येईल. हवामान खात्याने उद्याही मुंबईसाठी येलो अलर्ट जारी केला आहे. केरळमध्ये २९ घरे उद्ध्वस्त झाली आहेत आणि ८६८ घरांचे अंशतः नुकसान झाले आहे. ७ मे रोजी केरळ आणि माहे येथे काही ठिकाणी अतिवृष्टी, वादळ, विजांचा कडकडाट आणि ४०-५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. २८ मे ते १ जून दरम्यान मुसळधार ते अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.

# मोर्शी बस स्टॅन्ड परिसरात चोऱ्या करणाऱ्या महिलांचे त्रिकुट पोलिसांनी पकडले

## तिन्ही महिला वर्धा जिल्ह्यातील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७मोर्शी**


मोर्शी पोलिसांनी एसटी डेपो मध्ये चोऱ्या करणारी टोळी केली जेर बंद केली आहे छाया प्रमोद देऊळकर राहणार महावीर कॉलनी अमरावती ह्या मोर्शी वरून अमरावती बस मध्ये चढत असताना त्यांच्या गळ्यातील साडेचार ग्राम सोन्याचे मनी असलेले पोत कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्याची तक्रार दिल्यावर मोर्शी पोलिसांनी शिताफीने चोरी करणाऱ्या टोळीचा शोध घेऊन दोन तासात त्यांना अटक करून त्यांचे ताब्यातून फिर्यादीची चोरी गेलेले सोन्याचे मंगळसूत्र जप्त केले.

पोलीस सूत्रांच्या मिळालेल्या माहिती नुसार छाया प्रमोद देऊळकर ह्या मोर्शी येथे कामानिमित्त आले असता त्यांचे काम करून ते अमरावती येथे जाण्याकरिता मोर्शी अमरावती बस मध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने तिच्या गळ्यातील सोन्याची पोत चोरी केली हे फिर्यादीच्या लक्षात येताच फिर्यादीने मोर्शी पोलिसांकडे धाव घेतली असता पोलिसांनी संशयित तीन महिलांना ताब्यात घेतले त्यामध्ये आरोपी क्रमांक १- सौ संगीता जयसिंग रोकडे वय ४५ वर्ष२- ममता उर्फ शिल्पा रोहित सौदागर वय ३५ वर्ष३- सरला दौलत रोकडे वय ६५ वर्ष तिन्ही रा अशोक नगर बोरगाव रोड वर्धा तालुका जिल्हा वर्धा यांना पोलिसानी ताब्यात घेऊन त्यांची महिला पोलीस अंमलदार व महिला पंचां समक्ष अंग झळती घेतली असता त्यांचे ताब्यातून फिर्यादी यांचे गळ्यातील सोन्याची पोत किंमत अंदाजे ३६ हजार रुपये जप्त केली नमूद तिन्ही महिलांविरुद्ध पोलीस स्टेशन मोर्शी येथे अपराध क्रमांक २९१ कलम ३०५ ब क, ३(५) इछड प्रमाणे गुन्हा दाखल करून महिला आरोपींना अटक करण्यात आली आहे .

सदरची कारवाई विशाल आनंद पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत अमरावती ग्रामीण पोलीस उपविभागीय अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरकुल पोलीस अंमलदार संतुलाल उईके, राजेंद्र तुमडे छत्रपती करपते स्वप्निल बायस्कर यांनी नी केली असून पुढील तपास महिला पोलीस हवालदार विद्या कावरे करीत आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# यंदा जांभूळ खाताहेत भाव; ४०० रुपये किलो

## पावसाळ्याची चाहूल लागताच जांभळे बाजारात; आवक नसल्याने दर चढेच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ अमरावती**

लांबट आणि गोल आकाराची जांभूळ ही चवीला आंबट-गोड व रसरशीत असतात. उन्हाळ्याच्या शेवटी आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला जांभूळ बाजारात दाखल होतात. सध्या अकोला शहरातील बाजारात जांभळाची आवक सुरू झाली आहे. पण यावर्षी हंगामाच्या सुरुवातीस आवक कमी असल्याने दरही चढेच आहेत. एक किलोसाठी चारशे रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य ग्राहक मात्र खरेदी करण्याऐवजी दर विचारून बाजारातून काढत पाय घेत असल्याचे चित्र सध्या आहे.

सध्या जांभूळ या फळाची अमरावतीच्या बाजारात आवक सुरू झाली आहे. मात्र, पाऊस वाढेल, तसतशी या फळाची आवक जास्त प्रमाणात बाजारात वाढेल आणि दरही सर्वसामान्यांच्या आवाक्यात येईल, असे विक्रेत्यांनी सांगितले.



पावसाळ्यात, काळसर जांभळ्या रंगाच्या जांभळे मिळतात. निसर्गाने निर्माण केलेले हे फळ शरीरात अमृतासमान कार्य करते. वर्षाऋतूत जांभूळ महत्वाचे फळ मानले जाते. गोल, लांबट आकाराची जांभळे ही खरोखरच चवीला आंबट-गोड व रसरशीत असतात. उन्हाळ्यात आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला मिळणारी जांभळं खाण्यामुळे आपण आरोग्य चांगले ठेवू शकतो.

सध्या मध्य प्रदेशातून मालाची आवक शहरातील बाजारात रसरशीत जांभूळ दाखल झालेली आहेत. उन्हाळ्यातील फळांमध्ये जांभुळ ही एक लोकप्रिय फळ आहे. सध्या जांभूळ या फळाची बाजारात आवक सुरू झाली आहे. मात्र, पाऊस वाढेल तसतशी या फळाची आवक जास्त प्रमाणात बाजारात वाढत असते. जांभूळ या फळाचा कालावधी दोन ते अडीच महिन्याचा असतो. निसर्गाचा लहरीपणा, घटते पर्जन्यमान, वाढती वृक्षतोड यामुळे जांभळाच्या किमती वाढल्याचे पाहायला मिळत आहेत. सध्या ४०० रुपये प्रति किलो या भावाने बाजारत जांभळाची विक्री होत आहे.

